# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सिंधुदुर्ग

## Calligraphy Competition (सुलेखन स्पर्धा)

<u>सुधारित</u>

**१.स्पर्धेचा उद्देश-** (Aim of the competition)

कलात्मकता आणि सुलेखन कौशल्याला प्रोत्साहन देणे.

**२. स्पर्धेसाठी पात्रता- Eligibility of the teachers for the competition (if applicable)**

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत अध्यापन करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच शिक्षण विभागात कार्यरत अधिकारी व कर्मचारी स्पर्धेत सहभाग घेऊ शकतात.

- **वयोमर्यादा-**
  १८ ते ५८ वर्षे
- **कलात्मक लेखन**- अक्षर आकार व डिझाईन
- **लेखनातील सुस्पष्टता**- सुलभ व वाचनीय

**३. स्पर्धेची नोंदणी- Process of enrolment (one from each cluster)**

**दि.३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख केंद्रातील शिक्षकांची नोंदणी गुगल फॉर्म द्वारे ऑनलाईन करावी.**

**४.स्पर्धेचे स्वरुप- (Syllabus of the competition)**

- स्पर्धा मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेमध्ये होईल.
- मराठी, हिंदी किंवा इंग्रजी या भाषापैकी कोणत्याही एकाच भाषेत स्पर्धेच्यावेळी दिलेला आशय लेखन करणे आवश्यक आहे.
- स्पर्धेचा कालावधी ३० मिनिटे असेल.

**लेखन साहित्य-**

- सुलेखनासाठी आवश्यक असणारे साहित्य स्पर्धकांनी स्वत: आणावे. उदा. पेन्सिल, ब्रश टीप पेन, इंक (काळी व रंगीत), व्हाईट पेपर, कटर, इरेझर, कटपेन इत्यादी.

**५.स्पर्धेचे स्तर (Mode of the competition at Taluka, District, and State level)**

१. तालुका स्तर- तालुक्यातील सर्व केंद्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी सदर स्पर्धेसाठी पात्र असतील.

२. विभाग स्तर- प्रत्येक तालुक्यातून पहिला (एक) स्पर्धक विभाग स्तरासाठी पात्र असतील.

३. राज्यस्तर- विभाग स्तरावरील पहिले (पाच) स्पर्धक राज्य स्तरासाठी पात्र असेल.

**६.परीक्षकांची पात्रता व मानधन** (Assessment policy, number of selections and qualification of evaluators to be appointed at each stage)

**परीक्षकांची पात्रता-**

- साक्षरता सुलेखन क्षेत्रात तज्ज्ञ असावा.
- कॅलिग्राफी किंवा कला क्षेत्रात मान्यता प्राप्त संस्थेतून शैक्षणिक पात्रता असावी .(र डिग्रीमास्ट)

**मानधन**-परीक्षकांना मानधन शासकीय नियमानुसार देय असेल.

**७.पुरस्कार आणि प्रमाणपत्रे- (Nature of recommended prizes)**

शासन आदेशानुसार विजेत्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र / सन्मानचिन्ह दिले जाईल.

**८. सर्वसाधारण सुचना** (Any other details of need to be added suitably)

१) दिलेलया कालावधीमध्ये लेखन पूर्ण करणे आवश्यक आहे.

२) अनुकरणात्मक लिखाण केल्यास स्पर्धकास स्पर्धेतून बाद केले जाईल.

३) एक स्पर्धक एकाच भाषेतून स्पर्धेमध्ये सहभागी होऊ शकतो.

४) परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

५) स्पर्धकांसाठी ओळखपत्र आवश्यक असेल.

६) चारोळया, सुभाषिते, सुविचार, म्हणी हे साहित्य सुलेखनामध्ये ग्राह्य धरले जाणार नाही.

७) सुलेखन हे केवळ सुंदर हस्ताक्षर नसून आपण निवड केलेल्या साहित्य प्रकाराला न्याय देणारे असावे.

८)स्पर्धकांचे अभिप्राय घेतले जातील. या अभिप्रायाचा उपयोग भविष्यात सुधारणा करण्यासाठी होऊ शकेल.

९)मराठी, हिंदी किंवा इंग्रजी या भाषापैकी कोणत्याही एकाच भाषेत स्पर्धेच्यावेळी दिलेला आशय लेखन करणे आवश्यक आहे.

**मूल्यमापन/गुणदान तक्ता-**

| अ.क्र. | जिल्हा/तालुका | स्पर्धकाचे नांव | अक्षराची शुद्धता (प्रमाणबद्ध अक्षर, योग्य आकार, वळणदार अक्षर व अक्षरामध्ये सुंदरता, रेखीवपणा असावा) | वाक्यरचना (वाक्यरचनेत प्रमाणबद्धता, दोन शब्दात योग्य अंतर आणि सुसूत्रता असावी) | शुद्धलेखन (व्याकरण दृष्ट्या योग्य विरामचिन्हासह शुद्धलेखन असावे) | लेखन टापटीपपणा (लेखनामध्ये टापटीपपणा, स्वच्छपणा व आकर्षकपणा असावा.) | समय पालन (ठरवून दिलेल्या वेळेतच लेखन पूर्ण करणे आवश्यक आहे) | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गुण | | | २० | २० | २० | २० | २० | १०० |
| | | | | | | | | |

(राजेंद्र कांबळे)
प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,सिंधुदुर्ग.